(2)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** उदगीर ग्रामीण
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0169 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**03/04/2026 03:00

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिंनाक पासून):** 02/04/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 02/04/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Time From (वेळेपासून):** 14:07 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:07 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 03/04/2026 **Time (वेळ):** 02:09 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 03/04/2026 02:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचवटी हाटेल, अहमदपूर रोड,उदगीर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संतोश धनसिंग बर्गे

(b) **Father's/Husband's Name** (वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1976

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.** (पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग,लातुर,उदगीर ग्रामीण, लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबधक विभाग,लातुर,उदगीर ग्रामीण, लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7744812535

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल बाबुराव नागरगोजे | | | 1. सोनवळा ता उदगीर ,उदगीर ग्रामीण,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | राजकुमार पदमाकर पुजारी | | | 1. भीम नगर, नळदुर्ग,तुळजापुर, नळदुर्ग,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 45,000/ रूपये लाच रक्कम | 45,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

45,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिंनाक 02/04/2026

फिंयाद

मी संतोश धनसिंग बर्गे वय 50 वर्श, व्यवसाय -नोकरी, पद -पोलीस उप अधीक्षक, नेमणुक - लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, लातूर, मो नंबर -7744812535
सरकार तर्फे फिंयाद देतो की, मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, लातूर येथे 16 फेब्रुवारी 2024 पासून पोलीस उप अधीक्षक या पदावर कार्यरत आहे.
आम्ही दि. 01/04/2026 रोजी कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री. हसेन रामचंद्र धनवे यांनी कार्यालयात येवून एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणीची तक्रार असलेबाबत सांगितले. त्यावरून मी सापळा कारवाई आयोजीत करण्याकरीता दोन षासकीय पंच आवष्यक असल्याने दिंनाक 01/04/2026 रोजी मा. आयुक्त, महानगर पालीका, लातूर षहर यांचे नावे पत्र देवून त्यांच्या कार्यालयाकडील दोन कर्मचारी 1. प्रविण व्यंकटराव चिंद्रे, पद- कनिश्ठ अभियता 2. श्री निखील बालाजी ACB लातुरषेळके, पद- कनिश्ठ अभियता यांना गोपनीय कारवाई करिता पंच म्हणून उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना सदरचे ईसम हे तक्रारदार असल्याचे सांगुन त्यास त्यांचे नाव व पत्ता विचारला असता तक्रारदार यांनी त्यांचे नांव श्री. हसेन रामचंद्र धनवे वय 43 वर्श, व्यवसाय व्यापार रा. क्रिस्टल पार्क बिल्डींग, बी विंग सी, फ्लॅट नंबर 402,एच.व्ही. देसाई हाॅस्पीटल समोर, मोहम्मद वाडी, पुणे नगर, हडपसर, पुणे असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तोंडी तक्रार सांगितली सदरची तक्रार पोकाॅ/1759 कोंडरे यांनी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग येथील लॅपटाॅपवर टंकलिखीत केली ती पुढील प्रमाणे आहे. " मी वरील ठिकाणी राहण्यास असून व्यापार करून माझे कुटुंबाचा उदरनिंवाह करतो. माझा मेव्हणा रंजित मल्हारी पाटील यांचेविरूध्द सारिका मनोज पाटील (सोमवंषी) यांनी फिंयाद दिल्याने पोलीस स्टेषन उदगीर ग्रामीण, जि. लातूर येथे गुन्हा रजि. नंबर 162/2026 कलम 76,352,351 (2) भारतीय न्याय संहिता 2023 अन्वये दिंनाक 31/03/2026 रोजी गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक मुंडे साहेब हे करीत आहेत. सदर गुुन्हयाच्या तपासामध्ये मदत करून सदर गुन्हयाची थ्स् निल करून टाकतो असे म्हणून पोलीस स्टेषन उदगीर ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक पुजारी साहेब, पोलीस उप निरीक्षक मुंडे साहेब व पोलीस राहुल नागरगोजे हे माझ्याकडे 3,00,000/- रूपये मागणी करीत आहेत. पोलीस निरीक्षक पुजारी साहेब, पोलीस उप निरीक्षक मुंडे साहेब व पोलीस राहुल नागरगोजे हे मागत असलेली 3,00,000/- रूपये रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाल्याने, मी आज दिंनाक 01/04/2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, लातूर येथे तक्रार देण्यासाठी आलो आहे. माझी पोलीस निरीक्षक पुजारी साहेब, पोलीस उप निरीक्षक मुंडे साहेब व पोलीस राहुल नागरगोजे यांना लाच देण्याची बिलकुल ईच्छा नाही. परंतू मी त्यांना लाच दिली नाही तर ते माझे मेव्हण्याचे विरूध्द दाखल असलेल्या गुन्हयाचे तपासामध्ये मदत करणार नाहीत या भितीपोटी त्यांना होकार देवून स्वमर्जीने तक्रार देण्यासाठी आलो आहे.
मी दिंनाक 01/04/2026 रोजी पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण जि. लातूर येथे जाऊन पोलीस निरीक्षक पुजारी साहेब, पोलीस उप निरीक्षक मुंडे साहेब व पोलीस राहुल नागरगोजे यांची भेट घेऊन त्यांचे सोबत माझा मेव्हणा रंजित मल्हारी पाटील यांचे विरूध्द दाखल गुन्हया बाबत चर्चा करणार आहे. सदर चर्चे दरम्यान पोलीस निरीक्षक



Scanned with OKEN Scanner

पुजारी साहेब, पोलीस उप निरीक्षक मुंडे साहेब व पोलीस राहुल नागरगोजे यांनी स्वतः किंवा इतर मार्फत लाचेची मागणी करून ती स्वतः किंवा इतरांमार्फत स्वीकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. नमुद लोकसेवक यांचेषी माझा कसलाही आर्थिक अगर पैषाची देवाण घेवाणीचा व्यवहार नसून त्यांचे व माझे कुठलेही वैर नाही.'' अषा आषयाची तक्रार दिली असुन सदर तक्रार टंकलिखीत केल्यानंतर त्याची प्रिंट काढून वाचुन पाहुन तक्रारदार, मी व दोन्ही पंचानी तक्रारीवर सहया केल्या आहेत.

दिंनाक 01/04/2026 रोजी 18.00 वाजता आम्ही, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहन क्रमांक MH.24.AS.2777 चे चालक महेष बानाटे यांचेसह सापळा कारवाईकरीता आवष्यक असलेल्या सर्व साहित्यासह ला.प्र.वि.कार्यालय लातूर येथून रवाना होवून अहमदपूर रोड, उदगीर येथे पोहोचलो व आमचे वाहन रोडचे आडबाजूस लावले.

तक्रारदार यांनी नमुद लोकसेवक हे पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे हजर आहेत अगर कसे याची माहिती घेतली असता, सध्या पो.स्टेला फक्त पोलीस उप निरीक्षक मुंडे हजर असल्याची माहिती मिळाली. तक्रारदार हसेन रामचंद्र धनवे यांचे वर नमुद कामासाठी पोलीस स्टेषन उदगीर ग्रामीण येथील पोलीस उप निरीक्षक मुंडे यांनी तक्रारदार यांना लाचेची मागणी केली आहे अगर कसे? याची पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार श्री. हसेन रामचंद्र धनवे यांचे कामासंदर्भात व लाचेच्या मागणी संदर्भात तक्रारदार श्री. हसेन रामचंद्र धनवे व पोलीस उप निरीक्षक मुंडे यांचेत काय बोलणी होते ते डिजीटल व्हाॅईस
रेकाॅ
ड
रमध्ये ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन मी दोन्ही पंच व तक्रारदार यांना डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर बाबत सविस्तर माहिती दे
लाच मागणी पडताळणी पुर्वी मी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना सुचना दिंल्यानतर तक्रारदार हसेन रामचंद्र धनवे यांनी वर नमुद प्रमाणे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचेची मागणी पडताळणी करण्याचे ठरवुन व पो.अं./1759 कोंडरे यांचे मदतीने 20.05 वाजता डिजीटल व्हाॅइस
रेकाॅ
ड
र चालू करून तक्रारदार यांचे गळयात अडकावुन तक्रारदार यांना पंच क्रमांक 1 चिद्रे यांच्या सोबत पोलीस उप निरीक्षक मुंडे
त्यांनतर अंदाजे 21.02 वाजण्याच्या सुमारास तक्रारदार धनवे व पंच क्रमांक 1 चिद्रे हे परत सापळा पथकाच्या वाहनाजवळ आले असता पो.अं.1759 कोंडरे यांचे मदतीने तक्रारदार यांच्याकडील व्हाॅईस
रेकाॅ
ड
र बंद केले. मी, पंच क्रं. 1 चिद्रे यांना ते तक्रारदार यांचे सोबत पोलीस उप निरीक्षक मुंडे यांची भेट झाल्यानंतर तक्रारदार यांचे
दिंनाक 02/04/2026 रोजी सकाळी 09.00 वाजता आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहन क्रमांक MH.24.AS.2777 चे चालक महेष बानाटे यांचेसह सापळा कारवाईकरीता आवष्यक असलेल्या सर्व साहित्यासह ला.प्र.वि.कार्यालय लातूर येथून रवाना होवून अहमदपूर रोड, उदगीर येथे पोहोचलो व आमचे वाहन रोडचे आडबाजूस लावले. तेथे तक्रारदार हजर होते.
लाच मागणी पडताळणीपुर्वी मी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना सुचना दिंल्यानतर तक्रारदार धनवे यांनी वर नमुद प्रमाणे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचेची मागणी पडताळणी करण्याचे ठरवुन व पो.अं./1759 कोंडरे यांचे मदतीने 10.42 वाजता डिजीटल व्हाॅइस
रेकाॅ
ड
र चालू करून तक्रारदार यांचे गळयात अडकावुन तक्रारदार यांना पंच क्रमांक 1 चिद्रे यांच्या सोबत पोलीस ठाणे उदगीर ग्रामी



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

rajkumar padmakar pujari(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): rajkumar padmakar

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(स.):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे,उदगीर ग्रामीण
ता.उदगीर.जि.लातूर



Scanned with OKEN Scanner

दिनांक 02/04/2026

फिर्याद

मी संतोश धनसिंग बर्गे वय 50 वर्श, व्यवसाय -नोकरी, पद -पोलीस उप अधीक्षक, नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर, मो नंबर -7744812535

सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे 16 फेब्रुवारी 2024 पासून पोलीस उप अधीक्षक या पदावर कार्यरत आहे.

आम्ही दि. 01/04/2026 रोजी कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री. हसेन रामचंद्र धनवे यांनी कार्यालयात येवून एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणीची तक्रार असलेबाबत सांगितले. त्यावरून मी सापळा कारवाई आयोजीत करण्याकरीता दोन षासकीय पंच आवष्यक असल्याने दिनांक 01/04/2026 रोजी मा. आयुक्त, महानगर पालीका, लातूर षहर यांचे नावे पत्र देवून त्यांच्या कार्यालयाकडील दोन कर्मचारी 1. प्रविण व्यंकटराव चिद्रे, पद- कनिश्ठ अभियंता 2. श्री निखील बालाजी ACB लातुरषेळके, पद- कनिश्ठ अभियंता यांना गोपनीय कारवाई करिता पंच म्हणून उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना सदरचे ईसम हे तक्रारदार असल्याचे सांगुन त्यास त्यांचे नाव व पत्ता विचारला असता तक्रारदार यांनी त्यांचे नांव श्री. हसेन रामचंद्र धनवे वय 43 वर्श, व्यवसाय व्यापार रा. क्रिस्टल पार्क बिल्डींग, बी विंग सी, फ्लॅट नंबर 402,एच.व्ही. देसाई हॉस्पीटल समोर, मोहम्मद वाडी, पुणे नगर, हडपसर, पुणे असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तोंडी तक्रार सांगितली सदरची तक्रार पोकॉ/1759 कोंडरे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथील लॅपटॉपवर टंकलिखीत केली ती पुढील प्रमाणे आहे. " मी वरील ठिकाणी राहण्यास असून व्यापार करून माझे कुटुंबाचा उदरनिवार्ह करतो. माझा मेव्हणा रंजित मल्हारी पाटील यांचेविरूध्द सारिका मनोज पाटील (सोमवंषी) यांनी फिर्याद दिल्याने पोलीस स्टेषन उदगीर ग्रामीण, जि. लातूर येथे गुन्हा रजि. नंबर 162/2026 कलम 76,352,351 (2) भारतीय न्याय संहिता 2023 अन्वये दिनांक 31/03/2026 रोजी गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक मुंडे साहेब हे करीत आहेत. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये मदत करून सदर गुन्हयाची थस् निल करून टाकतो असे म्हणून पोलीस स्टेषन उदगीर ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक पुजारी साहेब, पोलीस उप निरीक्षक मुंडे साहेब व पोलीस राहुल नागरगोजे हे माझ्याकडे 3,00,000/- रूपये मागणी करीत आहेत. पोलीस निरीक्षक पुजारी साहेब, पोलीस उप निरीक्षक मुंडे साहेब व पोलीस राहुल नागरगोजे हे मागत असलेली 3,00,000/- रूपये रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाल्याने, मी आज दिनांक 01/04/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे तक्रार देण्यासाठी आलो आहे. माझी पोलीस निरीक्षक पुजारी साहेब, पोलीस उप निरीक्षक मुंडे साहेब व पोलीस राहुल नागरगोजे यांना लाच देण्याची बिलकुल ईच्छा नाही. परंतू मी त्यांना लाच दिली नाही तर ते माझे मेव्हण्याचे विरूध्द दाखल असलेल्या गुन्हयाचे तपासामध्ये मदत करणार नाहीत या भितीपोटी त्यांना होकार देवून स्वमर्जीने तक्रार देण्यासाठी आलो आहे.

मी दिनांक 01/04/2026 रोजी पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण जि. लातूर येथे जाऊन पोलीस निरीक्षक पुजारी साहेब, पोलीस उप निरीक्षक मुंडे साहेब व पोलीस राहुल नागरगोजे यांची भेट घेऊन त्यांचे सोबत माझा मेव्हणा रंजित मल्हारी पाटील यांचे विरूध्द दाखल गुन्हया बाबत चर्चा करणार आहे. सदर चर्चे दरम्यान पोलीस निरीक्षक पुजारी साहेब, पोलीस उप निरीक्षक मुंडे साहेब व पोलीस राहुल नागरगोजे यांनी स्वतः किंवा इतर मार्फत लाचेची मागणी करून ती स्वतः किंवा इतरांमार्फत स्वीकारल्यास त्यांचेवर कायदेषीर कार्यवाही करण्यात यावी. नमुद लोकसेवक यांचेषी माझा कसलाही आर्थिक अगर पैषाची देवाण घेवाणीचा व्यवहार नसून त्यांचे व माझे कुठलेही वैर नाही.'' अषा आषयाची तक्रार दिली असुन सदर तक्रार टंकलिखीत केल्यानंतर त्याची प्रिंट काढून वाचुन पाहुन तक्रारदार, मी व दोन्ही पंचानी तक्रारीवर सहया केल्या आहेत.

दिनांक 01/04/2026 रोजी 18.00 वाजता आम्ही, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहन क्रमांक MH.24.AS.2777 चे चालक महेष बानाटे यांचेसह सापळा कारवाईकरीता आवष्यक असलेल्या सर्व

Scanned with OKEN Scanner

साहित्यासह ला.प्र.वि.कार्यालय लातूर येथून रवाना होवून अहमदपूर रोड, उदगीर येथे पोहोचलो व आमचे वाहन रोडचे आडबाजूस लावले.

तक्रारदार यांनी नमुद लोकसेवक हे पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे हजर आहेत अगर कसे याची माहिती घेतली असता, सध्या पो.स्टेला फक्त पोलीस उप निरीक्षक मुंडे हजर असल्याची माहिती मिळाली. तक्रारदार हसेन रामचंद्र धनवे यांचे वर नमुद कामासाठी पोलीस स्टेषन उदगीर ग्रामीण येथील पोलीस उप निरीक्षक मुंडे यांनी तक्रारदार यांना लाचेची मागणी केली आहे अगर कसे? याची पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार श्री. हसेन रामचंद्र धनवे यांचे कामासंदर्भात व लाचेच्या मागणी संदर्भात तक्रारदार श्री. हसेन रामचंद्र धनवे व पोलीस उप निरीक्षक मुंडे यांचेत काय बोलणी होते ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन मी दोन्ही पंच व तक्रारदार यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देवुन त्यामध्ये नविन मेमरीकार्ड मी दोन्ही पंचासमक्ष फोडुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यात पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत झाले नसले बाबत दोन्ही पंचाना खात्री करुन देण्यात आली.

लाच मागणी पडताळणी पुर्वी मी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना सुचना दिल्यानंतर तक्रारदार हसेन रामचंद्र धनवे यांनी वर नमुद प्रमाणे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचेची मागणी पडताळणी करण्याचे ठरवुन व पो.अं./1759 कोंडरे यांचे मदतीने 20.05 वाजता डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांचे गळयात अडकावुन तक्रारदार यांना पंच क्रमांक 1 चिद्रे यांच्या सोबत पोलीस उप निरीक्षक मुंडे यांची भेट घेण्यासाठी पंचवटी हॉटेल, अहमदपूरकडे रवाना करून मी, पंच क्र. 02 षेळके व सापळा पथकातील ईतर सदस्य वाहनामध्ये थांबुन राहीलो.

त्यांनतर अंदाजे 21.02 वाजण्याच्या सुमारास तक्रारदार धनवे व पंच क्रमांक 1 चिद्रे हे परत सापळा पथकाच्या वाहनाजवळ आले असता पो.अं.1759 कोंडरे यांचे मदतीने तक्रारदार यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. मी, पंच क्रं. 1 चिद्रे यांना ते तक्रारदार यांचे सोबत पोलीस उप निरीक्षक मुंडे यांची भेट झाल्यानंतर तक्रारदार यांचे कामासंदर्भात व लाचेच्या रक्कमे संदर्भात काय बोलणी झाली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 चिद्रे यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार धनवे असे मिळुन पंचवटी हॉटेल, अहमदपूर रोड उदगीर येथे थांबलो त्यावेळी तक्रारदार यांनी पोलीस उप निरीक्षक, मुंडे यांना फोन करून पंचवटी हॉटेल, अहमदपूर रोड उदगीर येथे भेटण्यासाठी बोलावले. थोडया वेळानंतर पोलीस उप निरीक्षक मुंडे तेथे आले, तक्रारदार व पोलीस उप निरीक्षक मुंडे यांचेमध्ये कामाचे संबंधाने बोलणे झाले व पुढील बोलणे करण्यासाठी दिनांक 02/04/2026 रोजी सकाळी 10.00 वाजता येण्याचे सांगितले. पोलीस उप निरीक्षक मुंडे यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली नाही. अषी हकिकत पंच क्रमांक 1 चिद्रे यांनी सांगीतली. त्यानंतर तक्रारदार यांनी पोलीस अंमलदार नागरगोजे व पोलीस निरीक्षक पुजारी यांचे बाबत माहिती घेतली असता ते पोलीस ठाणे येथे हजर नसल्याचे समजले. पोलीस उप निरीक्षक मुंडे यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी न केल्यामुळे व दिनांक 02/04/2026 रोजी सकाळी 10.00 वाजता भेटण्या करिता बोलावल्यामुळे सदरची सापळा कार्यवाही स्थगीत करून पुढील सापळा कार्यवाही दिनांक 02/04/2026 रोजी करण्याचे ठरवून तक्रारदार यांना अहमदपूर रोड, उदगीर येथे येण्या बाबत सुचना देण्यात आली.

दिनांक 02/04/2026 रोजी सकाळी 09.00 वाजता आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहन क्रमांक MH.24.AS.2777 चे चालक महेष बानाटे यांचेसह सापळा कारवाईकरीता आवष्यक असलेल्या सर्व साहित्यासह ला.प्र.वि.कार्यालय लातूर येथून रवाना होवून अहमदपूर रोड, उदगीर येथे पोहोचलो व आमचे वाहन रोडचे आडबाजूस लावले. तेथे तक्रारदार हजर होते.

लाच मागणी पडताळणीपुर्वी मी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना सुचना दिल्यानंतर तक्रारदार धनवे यांनी वर नमुद प्रमाणे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचेची मागणी पडताळणी करण्याचे ठरवुन व पो.अं./1759 कोंडरे यांचे मदतीने 10.42 वाजता डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांचे गळयात अडकावुन तक्रारदार यांना पंच क्रमांक 1 चिद्रे यांच्या सोबत पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे पोलीस निरीक्षक पुजारी, पोलीस उप निरीक्षक मुंडे व पोलीस अंमलदार नागरगोजे यांची भेट घेण्यासाठी रवाना करून मी, पंच क्र. 02 षेळके व सापळा पथकातील ईतर सदस्य वाहनामध्ये थांबुन राहीलो.

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर अंदाजे 12.25 वाजण्याच्या सुमारास तक्रारदार धनवे व पंच क्रमांक 1 चिद्रे हे परत सापळा पथकाच्या वाहनाजवळ आले असता पो.अं.1759 कोंडरे यांचे मदतीने तक्रारदार यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. मी, पंच क्रं. 1 चिद्रे यांना ते तक्रारदार यांचे सोबत पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे पोलीस निरीक्षक पुजारी, पोलीस उप निरीक्षक मुंडे व पोलीस अंमलदार नागरगोजे यांची भेट झाल्यानंतर तक्रारदार यांचे कामासंदर्भात व लाचेच्या रक्कमे संदर्भात काय बोलणी झाली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 चिद्रे यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार धनवे असे मिळुन पोलीस ठाणे उदगीर येथे गेलो असता, तेथे पोलीस नागरगोजे यांची भेट झाली व तक्रारदार यांनी त्यांचे कामासंदर्भात चर्चा केली, तक्रारदार धनवे म्हणाले.... चला बर भेटुता.... त्यावर पोलीस नागरगोजे म्हणाले.... चलतय विचारून येतो मी....साहेब म्हणालते ती बाई पेट्रोलचा डब्बाच घेवून ग्याहत्तरच दाखल करा म्हणून... त्यावर तक्रारदार धनवे म्हणाले.... काय म्हणतो भावजी तुम्ही बोलून घ्या काय असल...मी मला हया गुन्हयातून मदत कषी करता येईल कस बाहेर काढता येईल...बगा म्हणाव...आम्हाला लई त्रास झाला...खोटा नाटा गुन्हा दाखल करून त्यावर पोलीस नागरगोजे म्हणाले.... साहेबा पुढं बोलू ना काय म्हणतेत.... त्यावर तक्रारदार धनवे म्हणाले... मंग तेच ना मागच्या वेळेस बी असच झाल...324 वरून 326.... 354 त्याच गुन्हयात का बर आम्ही का दुष्मण हाय का तुमचे... त्यानंतर तक्रारदार धनवे व पोलीस नागरगोजे हे पोलीस निरीक्षक पुजारी यांचे कॅबीन मध्ये गेले त्यावर तक्रारदार धनवे पोलीस निरीक्षक पुजारी यांना म्हणाले.... साहेब नमस्कार.... त्यावर पोलीस निरीक्षक पुजारी म्हणाले.....नमस्कार... त्यावर तक्रारदार धनवे म्हणाले...साहेब काय ओ हे विनाकारण त्रास आम्हाला... त्यावर पोलीस निरीक्षक पुजारी म्हणाले...आवो ती सरळ सरळ म्हणे माझ्ा बलात्काराचा गुन्हा घ्या साहेब... त्यावर तक्रारदार धनवे म्हणाले... आवो कस घेता येईल साहेब...आता उदया चार आठ दिवसांनी म्हणल माझ्या पोरीवर बलात्कार केला...म्हणून कसं कराव सांगा आता कस करता.... त्यावर पोलीस निरीक्षक पुजारी म्हणाले...तसल आम्ही घेणार नाही...त्यानंतर तक्रारदार धनवे पोलीस निरीक्षक पुजारी व पोलीस नागरगोजे हे पोलीस गाडीमध्ये बसुन निघून गेले व मी पोलीस ठाणेचे आवारात थांबून राहीलो. त्यानंतर काही वेळाने पोलीस गाडी पोलीस ठाणे येथे परत आली व तक्रारदार धनवे, पोलीस निरीक्षक पुजारी व पोलीस नागरगोजे हे पोलीस निरीक्षक यांचे कॅबीन मध्ये गेले. त्यानंतर तक्रारदार म्हणाले....हेच्यातुन कस मदत करताव सांगा आता...कस करताव सांगा....आम्हाला मदत झाली पाहीजे साहेब...पुन्हा नको व्हायला... मला सांगा तुम्हाला काय हे बघा आम्हाला हेच्यातुन बाहेर काढा बस येवढच बर का...उग खोटे नाटे गुन्हा दाखल व्हयलेत आमच्यावर काय ते....त्यावर पोलीस निरीक्षक पुजारी म्हणाले...आवो तेला विचारा ती बाई कषी करलालती 376 गुन्हा दाखल करा म्हणलालती... त्यावर तक्रारदार धनवे व पोलीस नागरगोजे हे कॅबीनचे बाहेर आले व तक्रारदार धनवे पोलीस नागरगोजे यांना म्हणाले...कषी कषी मदत करणाराव काय काय करणाराव हे सांगा म्हणाव पटकन सांगून मोकळे झाले की...त्यावर पोलीस नागरगोजे म्हणाले.... कोर्टात बिर्टात जायची आवष्यक्ता नाही...इथल्या इथ कायते करा म्हणले....कोर्टात बिर्टात काय पाठवणार नाही म्हणले...इथल्या इथ काय ते करून फायनल पाठवणार...पन्नास हजार रूपये सांगीतलेत...त्यावर तक्रारदार धनवे म्हणाले...पन्नास हजार दयायचेत.... पी.आय साहेबाचे पन्नास हजार दयायचेत....त्यावर पोलीस नागरगोजे म्हणाले...हं...त्यावर तक्रारदार धनवे म्हणाले...बाकी कुणाला दयायचे नाहीत...त्यावर पोलीस नागरगोजे म्हणाले....नाही विशय क्लोज...त्यावर तक्रारदार म्हणाले...जरा कमी करा म्हणाव...त्यांनाबी दयायचेत एक लाख रूपये...त्यावर पोलीस नागरगोजे म्हणाले.... कुणाला...त्यावर तक्रारदार धनवे म्हणाले....दुसरं कोणतरी हय...तेन नाही म्हणल म्हणून तर ते कुणाला काय नका मला काय दयायचे दया....त्यावर पोलीस नागरगोजे म्हणाले...साहेब तसं तर दोन लाख रूपये म्हणले होते मला...माझे मला पन्ना दया म्हणाव...बाकीच त्यांच त्यांनी बघुन घेतील...कस काय करायचं काय नाही ते माझ मी सांगतो म्हणले...त्यावर तक्रारदार धनवे म्हणाले....बरं बरं चालतंय... मी काय करतो आता माझ्याकड काय एवढे पैसे नाहीत आज...तुम्हाला तर माहीत आहे मी पैसे वापरणा बँका बंद हायता...मी कुठतर जुगाड लावतो...एखादा तासभराने येतील का साहेब?...त्यावर नागरगोजे म्हणाले....तुम्ही मला फोन करा की...त्यावर तक्रारदार म्हणाले...तुम्हाला फोन करू का त्यावर पोलीस नागरगोजे म्हणाले....हं....असे म्हणून सापळा पथकाच्या वाहनाजवळ परत आलो." अषी हकीकत पंच क्रमांक 1 चिद्रे यांनी सांगितली. मी, दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना विचारणा केली असता तक्रारदार यांनी थोडया वेळापुर्वी पंच क्रमांक 1 चिद्रे यांनी सांगितलेल्या हकीकतीषी मिळती जुळती हकीकत सांगितली. त्यानंतर तक्रारदार हसेन धनवे व पोलीस अंमलदार नागरगोजे यांचे व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पो.अं.1759 कोंडरे यांचे मदतीने चालू करून सर्वांनी ऐकले ते पंच क्रमांक 1 व तक्रारदार यांचे सांगणे प्रमाणे मिळते जुळते असल्याचे दिसून आले.

वरील झालेल्या संभाशणावरून पोलीस अंमलदार नागरगोजे यांनी तकारदार यांना मागणी केलेली 50,000/- रुपये (8)
लाचेची रक्कम स्वीकारण्यास सहमती दर्षविल्याचे निश्पन्न झाले. त्यानंतर पोलीस अंमलदार नागरगोजे यांनी मागणी केलेली 50,000/- रुपये लाचेची रक्कम तक्रारदार धनवे यांना हजर करण्यास सांगितले असता, त्यांनी सांगितले त्यांचेकडे सध्या 45,000/- रूपये आहेत असे सांगितले. त्यावरून पोलीस अंमलदार नागरगोजे यांचे विरूध्द 45,000/- रूपयाची सापळा कार्यवाही आजमावण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. आम्ही तक्रारदार व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/1256 गंभीरे यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन तक्रारदार यांच्या पॅटच्या समोरील उजव्या बाजुच्या खिष्यामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर सुनियोजीत ईषारा करणेबाबत सांगण्यात आला. त्यानंतर आम्ही, तक्रारदार दोन्ही पंच व सापळाACB लातुर पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. त्यानंतर पोकॉ/1759 कोंडरे यांचे मार्फतीने 13.40 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन तक्रारदार यांचे गळयात अडकावुन पंचवटी हॉटेल, अहमदपूर रोड, उदगीर येथे जाण्यास सांगितले. आम्ही व सापळा पथक सदर हॉटेलच्या आजुबाजुस कोणाच्या नजरेत येणार नाही असे अडबाजुस थांबुन राहिले. त्यानंतर तक्रारदार हसेन धनवे यांनी नियोजीत लाचस्विकृतीचा इषारा केला. आम्ही, पंच क्र. 02 षेळके व सापळा पथकातील सदस्यासह घटनास्थळी हजर आलो. पोकॉ/1759 कोंडरे यांनी तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्ड काढून घेवून 14.24 वाजण्याच्या सुमारास बंद केले. त्यावेळी आम्ही पंच क्रमांक 1 चिद्रे यांना ते तक्रारदार यांचे सोबत पंचवटी हॉटेल, अहमदपूर रोड, उदगीर येथे गेल्यानंतर पोलीस अंमलदार नागरगोजे यांची भेट झाल्यानंतर तक्रारदार यांचे कामासंदर्भात व लाचेच्या देवाण घेवाण बाबत काय बोलणी झाली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 चिद्रे यांनी सांगितले की, मी व तक्रारदार धनवे असे मिळुन पंचवटी हॉटेल येथे गेलो असता, तेथे पोलीस नागरगोजे यांची भेट झाली व तक्रारदार यांनी त्यांचे कामासंदर्भात चर्चा केली, तक्रारदार धनवे म्हणाले...काय हाय हे आमाला लई त्रास झाला बघा हे खोटे नाटे गुन्हा दाखल करून...असे चार महीन्या पुर्वी ते 324 चा 326 केलं...पी.आय साहेबानी...तेच्यानंतर 354 केल तेला अॅड का बर अस करतय आमच्या सोबत अन्याय किती अवघड हाय...त्यावर पोलीस नागरगोजे म्हणाले...तेच कस हाय महीतय का...तेच्यामध्ये साहेबाची चुक नाही...तेच लोक किती दिवस उपोशनाला बसले होते....साहेबान काय केला माहीतय का...चैकशीवर ठेवायच म्हणले....त्यावर तक्रारदार धनवे म्हणाले...हेवका आता कस हाय...दोन चार दिवस झाल बँक बंद होती...पैसे काही निघाले नाहीत...पंचेचाळीस हजार निघालेत...पाच हजार रूपये तुम्हाला नेक्सट टाईम तुम्हाला पाचच्या जागी दहा देतो....हेवका ही घ्या...मापून घेताव का...त्यावर पोलीस नागरगोजे म्हणाले अय...तुम्ही म्हणलो विशय संपला...त्यावर तक्रारदार म्हणाले...मंग फोन लावा एक साहेबाला का जावून भेटायच साहेबाला...त्यावर पोलीस नागरगोजे म्हणाले...नाही साहेब हेला गेलेत...पाटलाला येवून फक्त एक सही करून जावा म्हणाव...त्यावर पोलीस नागरगोजे यांनी पोलीस निरीक्षक पुजारी यांना फोन करून म्हणाले....धनवे साहेबांनी काम केलय बरं का....सर काय नाही धनवे साहेब भेटले मला हं...एक मिनीट बोला त्यांचेषी....त्यावर तक्रारदार धनवे म्हणाले....साहेब नमस्कार...त्यावर पोलीस निरीक्षक पुजारी म्हणाले...जरा लोक बसलेत मया समोर पाठवून दयाना...काय काय दयायचे तुम्हाला मदत करता येईल आम्हाला...त्यावर तक्रारदार म्हणाले...जरा मदत करा बरं...त्या गुन्हयातुन बाहेर काढा साहेब आम्हाला... असे म्हणून पोलीस निरीक्षक पुजारी यांनी फोन ठेवला व लाच स्वीकृतीचा पुर्वनियोजीत ईषारा केला व त्यानंतर पोलीस उप अधीक्षक संतोश बर्गे व सपळा पथक घटना स्थळी आले अषी हकिकत पंच क्रमंाक 1 चिद्रे यांनी सांगीतली. त्यावरून आम्ही लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 चिद्रे यांनी समोर लाल रंगाचा षर्ट व निळया रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती हे पोलीस अंमलदार नागरगोजे असुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारुन अंगातील पॅंटच्या समोरच्या उजव्या बाजूचे खिष्यामध्ये ठेवल्याचे सांगीतले. त्यावरून आम्ही लागलीच पोलीस अंमलदार नागरगोजे यांना ताब्यात घेतले.

आम्ही आमचे ओळखपत्र दाखवून पोलीस अंमलदार नागरगोजे यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव राहुल बाबुराव नागरगोजे वय 42 वर्शे, पद- पोह/1337, नेमणुक पोलीस ठाणे उदगीर षहर रा. सोनवळा ता.उदगीर असे असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही पंच क्रमांक 2 षेळके यांचे हस्ते पो.ह/1337 राहुल नागरगोजे यांचे पॅंटच्या उजव्या खिष्यातील लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 चिद्रे यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरषी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्षनास

Scanned with OKEN Scanner

आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक पुजारी यांचेकडे पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे रवाना झालो. पोलीस निरीक्षक पुजारी हे त्यांचे कार्यालयात मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. पोलीस निरीक्षक पुजारी यांना आमचे ओळखपत्र दाखवून त्यांचेवर झालेल्या कार्यवाहीबाबत थोडक्यात माहिती दिली व त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव राजकुमार पदमाकर पुजारी वय 44 वर्श, पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक पोलीस ठाणे, उदगीर ग्रामीण रा.भीम नगर, नळदुर्ग, ता. तुळजापुर जि. धाराषिव ह.मु. नंदनवन कॉलनी फ्लॅट क्रमांक 304, मधुबन सोसायटीच्या जवळ, लातूर असे सांगीतले. त्यानंतर दोन्ही आरोपींना ताब्यात घेवुन तेथील आवष्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पुढील कार्यवाही करणेकरीता घटनास्थळावरुन रवाना होवून ला.प्र.वि कार्यालय, लातूर येथे येवुन पुढील कार्यवाही पुर्ण केली आहे. 

तरी यातील आरोपी क्रमांक 1 राहुल बाबुराव नागरगोजे वय 42 वर्शे, पद- पोह/1337, नेमणुक पोलीस ठाणे उदगीर षहर रा. सोनवळा ता.उदगीर यांनी आरोपी क्रमांक 2 राजकुमार पदमाकर पुजारी वय 44 वर्श, पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक पोलीस ठाणे, उदगीर ग्रामीण रा.भीम नगर, नळदुर्ग, ता. तुळजापुर जि. धाराषिव ह.मु. नंदनवन कॉलनी फ्लॅट क्रमांक 304, मधुबन सोसायटीच्या जवळ, लातूर यांचे सांगण्यावरुन तक्रारदार यांचे मेव्हणे रंजित पाटील यांचे विरूध्द पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे दाखल असलेल्या गुन्हा रजि. नंबर 162/2026 कलम 76,351(2),352 मध्ये मदत करण्यासाठी म्हणून दि.02/04/2026 रोजी पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे पंचासमक्ष 50,000/-रू. लाचेची मागणी केली. आरोपी क्रमांक 1 राहुल बाबुराव नागरगोजे यांनी आरोपी क्रमांक 2 पोलीस निरीक्षक पुजारी यांचे वतीने तक्रारदार यांचेकडून 45,000/- रूपये लाच रक्कम पंचवटी हॉटेल, अहमदपूर रोड, उदगीर येथे 14.07 वाजता पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे. लाच रक्कम स्वीकारल्यानंतर आरोपी क्रमांक 1 राहुल बाबुराव नागरगोजे यांनी आरोपी क्रमांक 2 राजकुमार पदमाकर पुजारी यांना तक्रारदार यांचे समक्ष फोन करून धनवे साहेबांनी काम केलय बरं का सर असे म्हणून तक्रादार त्यास भेटल्याची माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार हे आरोपी क्रमांक 1 पोलीस नागरगोजे यांचे फोन वरून आरोपी क्रमांक 2 पोलीस निरीक्षक पुजारी यांचेसोबत बोलले असता आरोपी क्रमांक 2 यांनी पाठवून दयाना...काय काय दयायचे तुम्हाला मदत करता येईल आम्हाला असे म्हणून लाच मिळविण्याचा प्रयत्न करून आरोपी क्रमांक 1 पोलीस नागरगोजे यांचे करवी लाच रक्कम स्वीकारली आहे.

म्हणुन माझी आरोपी क्रमांक 1 राहुल नागरगोजे,पोह/1337 नेमणुक पोलीस ठाणे उदगीर षहर व आरोपी क्रमांक 2 राजकुमार पुजारी,पोलीस निरीक्षक नेमणुक पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण यांचेविरुध्द भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेषीर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

(संतोष ध. बर्गे)
पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with OKEN Scanner

(10)

## General Diary Details
## ठाणे दैनंदिनी तपशील

**State (राज्य):** महाराष्ट्र  **District (जिल्हा):** लातूर

**P.S. (पोलीस ठाणे):** उदगीर ग्रामीण

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.):** 004
2. **G.D. Date & Time (ठा. दै. दिंनाक आणि वेळ):** 03/04/2026 03:27 वाजता
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार):** इतर
4. **Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी )):** BHIMULAXMANDEVKAR /पोलीस उपनिरीक्षक
5. **Case Type (प्रकरणाचा प्रकार) :**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**
   यावेळी नोंद करण्यात येते की पोस्टे गुरनं 169/2026 कलम 7 भ्र.प्र.अधिनियम 1988 अन्वये दाखल फिंयादमध्ये 8000 पेक्षा जास्त शब्द सी सी टी एन एस प्रणालीमध्ये समाविष्ठ होत नसल्याने व तांत्रीक अडचनीमुळे फिंयादीचा मजकुर अपुर्ण आलेला असुन अक्षर तुटक येत असल्याने संपुर्ण फिंयाद मजकुर सी सी टी एन एस प्रथम खबर अहवालासोबत जोडली आहे
7. **G.D. Subject (ठा. दै. चा विषय):**
   नोंद
8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

**Report Printed on**
**(अहवाल मुद्रित केलेला दिंनाक):** 03/04/2026

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**

**Name (नाव):** rajkumar padmakar pujari

**Rank (पद):** I (Inspector)

**Signature of G.D. Entry By (ठा. दै. नोंद करणाऱ्याची सही):**

**Name (नाव):** rajkumar padmakar pujari

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):**

पोलीस ठाणे, उदगीर ग्रामीण
ता.उदगीर,जि.लातूर



Scanned with OKEN Scanner